दिनांक १२.११.२०२५.

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ मिराबाई शांताराम भिल यांचा शपथेवर उलटतपास वादीतर्फे वकील श्री. एस. व्ही. पटेल यांच्यामार्फतः**

१३. माझे शिक्षण झालेले नाही. मी मजूरी करते. वादी भिकन हे माझे मामा आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे गावचे पुर्नवसन झालेले आहे. हे मला समजत नाही की, माझ्या गावचे पुर्नवसन झाल्याने माझे मामा भिकन यांना शासनाने पुर्नवसनामध्ये प्लॉट क्र. १६७ हा दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, मला पुर्नवसन मध्ये घर भेटलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी भिकन यांच्या घराचे पक्के बांधकाम असून ते पत्र्याचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी भिकन यांच्या घराचे दोन भाग असून एका भागामध्ये मी राहते. साक्षीदार स्वतःहून सांगते की, माझे स्वतःचे घर आहे. हे मल माहीत नाही की, माझ्या मामाच्या घराचे दोन उतारे आहेत.

१४. हे म्हणणे खरे आहे की, मी मामाच्या घराशेजारी राहते व त्यांच्या व माझ्या घरादरम्यान एकच भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे घर माझ्या मामाच्या घराच्या मागे आहे. हे मला आठवत नाही की, माझ्या घराचा मालमत्ता क्र. ४८७ असा आहे. माझ्या घराच्या उत्तरेस – शारदाबाई व हिराबाई विजू हे राहतात, दक्षिणेस– मामा वादी भिकन हे राहतात, पूर्वेस – वना धन्या हे राहतात व पश्चिमेस – रमण रवि हे राहतात.

१५. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मालमत्ता क्र. ४८७ यास घरकूल मिळालेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या घराच्या बांधकामासाठी मला माझ्या मामाच्या घरात राहण्यास यावे लागले. हे म्हणणे खरे नाही की, मी मामाला म्हणाले की, मला माझे घर बांधणे होईपर्यंत ११ महिने तुमच्या घरात राहू दया. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अशा बोलण्यावरुन मामाने मला त्याच्या घरात राहूल दिले. हे म्हणणे खरे नाही की, ११ महिने झाल्यावर माझ्या मामांनी

सांगितले की, माझा परिवार मोठा आहे, तुम्ही घर खाली करणे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, मी घर खाली करण्यास नकार दिल्याने माझ्या मामांनी मला वकीलांमार्फत नोटीस दिली. माझ्या मामाच्या घरात किती खोल्या आहेत हे मला माहीत नाही. हे मला माहीत नाही की, माझ्या मामाच्या घरात दोन खोल्या ज्यात एक स्वयंपाक घर व एक हॉल आहे.

१६. हे मला माहीत नाही की, माझ्या मामाच्या घरात किती जण राहतात. वादी यास पत्नी, मुलगा, सूनबाई व नातवंड असे सर्व आहेत. माझ्या मामाच्या घराच्या चतुसिमा मला सांगता येणार नाहीत.

१७. हे म्हणणे खरे नाही की, मी रहात असलेले घर हे माझ्या मामाचे असून ते हडप करण्याचा माझा उद्देश आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. २९ वर जे पुरावा शपथपत्र दिलेले आहे ते वकील साहेबांनी लिहिलेले आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, त्याकामी मी सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये काय लिहिले हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

POOJA NARAYAN KOKATE
Digitally signed by POOJA NARAYAN KOKATE
Date: 2025.11.12 17:49:44 +0530

शिरपूर.
दिनांकः १२.११.२०२५.

(श्रीमती पूजा ना. कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिरपूर,
जि. धुळे.
**JO Code-2489**